आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१९ ऑक्टोबर २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- दिवाळीनिमित्त अयोध्येत शरयू तिरावर दीपोत्सव साजरा

- चांद्रयान-२ नं सूर्याच्या पृष्ठभागावरून उत्सर्जित होणाऱ्या ‘कोरोनल मास इजेक्शन’ चा चंद्रावर पडणारा प्रभाव प्रथमच टिपला असून, हे विज्ञान क्षेत्रातलं ऐतिहासिक यश असल्याची इस्त्रोची माहिती

- मतदार यादीतल्या त्रुटी दूर कराव्यात या मागणीसाठी येत्या १ नोव्हेंबर रोजी मुंबईत विरोधी पक्षांचा मोर्चा

**आणि**

- भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात झालेल्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियाचा भारतावर ७ गडी राखून विजय

**<><><><><>**

भगवान श्री राम यांच्या आगमनाचा सोहळा साजरा करण्यासाठी उत्तरप्रदेशात शरयू नदीच्या किनाऱ्यावर भव्य दीपोत्सव साजरा होत आहे. राम की पौडी इथल्या ५६ घाटांवर आज २६ लाखांपेक्षा जास्त दिवे प्रज्वलित केले आहेत. या सोहळ्याला उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित आहेत. मुख्यमंत्र्यांनी शरयू नदीची आरती केली आणि त्यानंतर दीपप्रज्वलनाने दीपोत्सवाची सुरुवात झाली. यावेळी लेझर शो आणि रामायणावर आधारित नृत्याचा कार्यक्रम सादर झाला.

**<><><><><>**

दिवाळीनिमित्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. दिवाळीचा सण अंधारावर प्रकाशाचा, अन्यायावर न्यायाचा आणि

नकारात्मकतेवर सकारात्मकतेच्या विजयाचं प्रतीक असल्याचं राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे..

**<><><><><>**

नुकत्याच लागू झालेल्या जीएसटी सुधारणांमुळे सणासुदीच्या दिवसांमध्ये खरेदीच्या उत्साहात भर पडली असून, यंदा ग्राहकोपयोगी वस्तूंची विक्रमी विक्री होत आहे. धनत्रयोदशीच्या दिवशी काल देशभरात एकूण व्यापार १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाल्याचा अंदाज असून, गेल्या काही वर्षांमधला हा सर्वात उत्साहाचा हंगाम ठरला आहे. यंदा धनत्रयोदशीच्या दिवशी सोन्या-चांदी च्या वस्तूंबरोबर वाहन खरेदीमध्येही तेजी दिसून आली. सोन्याच्या नाण्यांना सर्वाधिक मागणी असून, हॉलमार्क-प्रमाणित हलक्या दागिन्यांनाही ग्राहकांची पसंती मिळत आहे.

**<><><><><>**

चांद्रयान-२ नं आपल्या वैज्ञानिक उपकरणांच्या साहाय्यानं सूर्याच्या पृष्ठभागावरून उत्सर्जित होणाऱ्या 'कोरोनल मास इजेक्शन' चा चंद्रावर पडणारा प्रभाव पहिल्यांदाच  टिपला असून, हे विज्ञान क्षेत्रातलं ऐतिहासिक यश असल्याचं इस्त्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं म्हटलं आहे.

चांद्रयान-२ नं टिपलेल्या नोंदींमुळे चंद्राचं बाह्य क्षेत्र, चंद्रावरचं विरळ वातावरण आणि त्याच्या पृष्ठभागावर होणारा अवकाशातल्या हवामानाचा प्रभाव समजून घ्यायला सहाय्य होईल, असं बंगळुरू इथल्या इस्त्रोच्या मुख्यालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. २२ जुलै २०१९ रोजी श्रीहरीकोटा इथून प्रक्षेपित करण्यात आलेल्या चांद्रयान-२ नं, २० ऑगस्ट २०१९ रोजी, चंद्राभोवतालच्या लंबवर्तुळाकार कक्षेत यशस्वीपणे प्रवेश केला होता. ७ सप्टेंबर २०१९ रोजी लँडिंगच्या प्रयत्नादरम्यान यानाचा विक्रम लँडरशी संपर्क तुटला होता, तरी ते पूर्णपणे कार्यरत असून ते चंद्राच्या कक्षेत कार्यरत असल्याचं इस्त्रोनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

महायुतीचं सरकार येताच ओबीसी मंत्रालयाची स्थापना केली तसंच ओबीसींच्या प्रगतीसाठी विविध योजना सुरू केल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. महाज्योती अर्थात महात्मा ज्योतिबा फुले संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या प्रशासकीय इमारतीचं भूमिपूजन तसंच कोनशीलेचं अनावरण आज नागपुरात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. राज्य सरकारने ओबीसीसाठी सुरू केलेल्या पंजाबराव देशमुख भत्ता योजना, प्रशिक्षणाच्या योजना, स्वयंरोजगाराच्या योजनांचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी केला. सरकारने आतापर्यंत महाज्योतीला मोठ्या प्रमाणात निधी दिला, तसंच वसतीगृहं सुरू केली, आर्थिक विकास महामंडळं बळकट केली असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

मतदार यादीतल्या त्रुटी दूर कराव्यात या मागणीसाठी येत्या एक नोव्हेंबर रोजी मुंबईत विरोधी पक्षांचा मोर्चा काढण्यात येणार आहे. खासदार संजय राऊत यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. मतदार यादीतल्या त्रुटीकडे विरोधी पक्ष निवडणूक आयोगाचं सातत्याने लक्ष वेधत आहे. मात्र निवडणूक आयोग विरोधकांच्या मागण्यांची दखल घेत नाही, मतदार यादीत कुठल्याही प्रकारच्या त्रुटी नाहीत असं आयोगाचं म्हणणं आहे, त्यामुळे मोर्चा काढण्याचा निर्णय घेतल्याचं राऊत म्हणाले. मुंबईतल्या मोर्चात राज्यभरातून लोक येतील, या मोर्चात ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, राज ठाकरे सहभागी होतील, असं राऊत यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबईतील गोरेगाव इथं आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा मुंबई महानगर प्रदेश मतदार यादी प्रमुख मेळावा झाला. राज्यातल्या मतदार यादीत ९६ लाख बनावट मतदार असल्याचा आरोप राज ठाकरे यांनी यावेळी केला. राज्यात निष्पक्ष

निवडणूका होत नाहीत, असा आरोप करत राज ठाकरे यांनी सत्ताधारी पक्षावरही टीका केली.

**होल्ड बाईट राज (१३ सेकंद)**

मतदार यादीतील त्रुटी दूर होईपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊ नयेत या मागणीचा पुनरूच्चार ठाकरे यांनी केला.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पर्थ इथं झालेल्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतावर ७ गडी राखून विजय मिळवला. या विजयासोबतच ऑस्ट्रेलियानं तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

डकवर्थ लुईस नियमानुसार ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी २६ षटकांमध्ये १३१ धावांचं लक्ष्य होतं. ऑस्ट्रेलियानं ते ३ गड्यांच्या मोबदल्यात पार केलं. नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाचा संघ प्रथम क्षेत्ररक्षणाला उतरला. त्यांच्या गोलंदाजीसमोर भारतीय फलंदाज टिकाव धरू शकले नाहीत. नाबाद ४६ धावा करणारा ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्श सामनावीर ठरला.

**<><><><><>**

आयसीसी महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज इंदौर इथं सुरू असलेल्या सामन्यात इंग्लंडनं भारतासमोर ८ गड्यांच्या मोबदल्यात २८८ धावांचं आव्हान ठेवलं आहे. हेदर नाईट आणि ब्रण्ट यांनी केलेल्या ११३ धावांच्या भागीदारीमुळे इंग्लडच्या खेळीला आकार मिळाला. हेदर नाईटनं १०९ धावा केल्या.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ४ षटकात १ बाद १४ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

भंडारा भाजपच्या महिला जिल्हा उपाध्यक्ष कल्याणी भुरे यांनी आज नरेंद्र भोंडेकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पक्षात प्रवेश केला आहे. भाजपा मध्ये महिलांना डावललं जात असल्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करत असल्याचं त्यांनी वार्ताहरांना सांगितलं. तुमसर नगरपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही घटना महत्वाची मानली जात आहे.

<><><><><>

गडचिरोली इथं आज आदी कर्मयोगी अभियानाला सुरुवात झाली. या अभियानांतर्गत जिल्ह्यातल्या १२ तालुक्यांमध्ये ४४१ गावांचा समूह तयार करण्यात आला. तसंच गावांपर्यंत योजना पोहचण्यासाठी प्रशिक्षक तयार करण्यात आले. आतापर्यंत ५५३ ग्रामसभा घेण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात ५२२ मोबाईल मनोरे उभारण्यात आले आहेत.

<><><><><>

सहायक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असलेल्या यूजीसी नेट परीक्षेचं वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. नेट परीक्षा दिनांक ३१ डिसेंबर २०२५ ते ७ जानेवारी २०२६ दरम्यान देशभरातील विविध परीक्षा केंद्रांवर होणार आहे. NTA अर्थात नॅशनल टेस्टिंग एजन्सीने ही माहिती दिली. या परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून, अर्ज भरण्याची अंतिम तारीख ७ नोव्हेंबर आहे. परीक्षा कोणत्या शहरांमध्ये आणि कोणत्या केंद्रांवर होईल, याची यादी परीक्षेच्या १० दिवस आधी अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल.

//<><><><><>//